**निशाणी ५ वरील आदेश (नि.दि.दा.क्र.७/२०१७)**

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं. १ विरुध्द तुर्तातूर्त ताकिद मिळण्यासाठी दाखल केला आहे. मौजे सोनगांव , ता. जावली , जि. सातारा येथील शेत जमिन गट नं. ८७७, १०१, ३२७, ३३४, ३७० व ४८१ तसेच सोनगांव ग्रामपंचायत मिळकत नं. ४३, ४३/१ व ३७ या मिळकती प्रस्तुत अर्जाचा विषय असून, त्यास यापुढे संक्षेपार्थ 'दावा मिळकत' असे संबोधले आहे.

अर्जातील वादीचे कथनांचा सारांश पुढीलप्रमाणे–

२. दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या वडीलार्जीत मालकी कब्जेवहिवाटीच्या असून, सदर मिळकतींचे सरसनिरस वाटप होवून पृथक कब्जा मिळण्यासाठी वादी यांनी प्रस्तुत दावा दाखल केला आहे. वादीचे आईचे आईवडील व मामा यांनी वादीचे शिक्षणासाठी खर्च केला असून, प्रतिवादी चैनीचे जीवन जगत आहे. प्रतिवादी नं. १ यांनी अनेक वाहने खरेदी करुन कर्जे काढली आलेत. सर्व मिळकतींची विक्री करुन कोणतीही मिळकत शिल्लक ठेवणार नाही अशी धमकी प्रतिवादी नं. १ ने वादीस दिनांक ३०.१.२०१७ रोजी दिली. वादीस उत्पन्नाचे साधन नसल्याने, दावा मिळकती तबदिल झाल्यास वादीचे नुकसान होणार आहे. सबब, दावा मिळकतींची विक्री अगर तबदिली प्रतिवादी नं. १ ने करु नये अशी तुर्तातूर्त ताकिद मिळण्यासाठी वादीने प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादी नं. १ यांनी नि.२३ येथे म्हणणे दाखल करुन अर्जास प्रखर विरोध केला. आवश्यक पक्षकार सामील न केल्याची बाधा दाव्यास येत असल्याने सदर अर्ज चालण्यास पात्र नसल्याचे प्रतिवादीचे कथन आहे. सर्व दावा मिळकती वडीलार्जीत नाहीत व प्रतिवादी यास २ बहिणी असून, त्यांचाही दावा मिळकतीत हिस्सा असल्याने त्यांना याकामी सामील करणे आवश्यक आहे. प्रतिवादीविरुध्द वाटपाचा दावा याच न्यायालयात प्रलंबीत असून, त्याची माहिती वादीस असतानाही प्रस्तुतचा दावा जाणूनबुजून दाखल केला असल्याने तो कायद्याने चालण्यास पात्र नाही. दावा मिळकती

या बँक ऑफ महाराष्ट्र शाखा कुडाळ यांचेकडे तारणगहाण असल्याने त्या तबदील करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. प्रतिवादीस दावा मिळकती तबदिल करण्याचे कोणतेही कारण नाही व असा विक्री व्यवहार झाल्यास त्याला प्रलंबीत दावा (lis pendence) या तत्वाची बाधा येते. सबब, अर्ज नामंजूर करणेत यावा असे प्रतिवादीचे कथन आहे.

४. अर्ज व म्हणण्यातील कथनांवरुन पुढील वादप्रश्न उपस्थित होतात. सदर वादप्रश्न व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे आहेत.

| वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|
| १. वादी सकृतदर्शनी केस शाबीत करतात काय ? | .. होकारार्थी |
| २. सोईची बाब वादींचे बाजूने आहे काय ? | .. होकारार्थी |
| ३. मनाईचा अर्ज नामंजूर झाल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | .. होकारार्थी |
| ४. आदेश काय ? | .. अर्ज मंजूर करणेत आला. |

## कारणमिमांसा

५. वादी यांचे विधीज्ञ यांनी युक्तिवादात असे प्रतिपादन केले की, दावा मिळकती या वादी व प्रतिवादी नं. १ यांच्या वडीलार्जीत मिळकती असल्याने त्यात वादीचा हिस्सा आहे. दिलेल्या धमकीनुसार प्रतिवादी नं. १ यांनी दावा मिळकतींची विक्री केल्यास वादीचे अपरीमीत नुकसान होणार आहे. प्रतिवादीविरुध्द दाखल असणारा वाटपाचे दाव्याबाबत वादीला कल्पना नाही. त्यामुळे अर्ज मंजूर करण्यात यावा असे प्रतिपादन त्यांनी केले.

६. प्रतिवादी नं. १ चे विधीज्ञ यांनी युक्तिवाद की, प्रतिवादी नं. १ च्या २ बहिणींना कामी

पक्षकार केलेले नाही. सर्व वडीलार्जीत मिळकती या कामी सामील केलेल्या नाहीत. दावा मिळकती तबदिल करण्याच्या प्रयत्नात प्रतिवादी असल्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. दावा मिळकती बँकेकडे तारणगहाण असल्याने त्या तबदिल करण्याचा प्रश्न उदभवत नाही. सबब, प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात यावा असे प्रतिपादन त्यांनी केले .

**<u>वादप्रश्न क्रमांक १ ते ३ करीताः</u>**–

७ . वादी हा प्रतिवादी नं. १ चा मुलगा आहे. प्रतिवादी नं. २ ही वादीची आई आहे. नि. ७ ते १२ येथील ७/१२ उतारे तसेच नि. १३ ते १५ येथील दावा घर मिळकतींचे कर आकारणी उतारे यांचे अवलोकन करता, त्यात भोगवटदार सदरी प्रतिवादी नं. १ चे नावाची नोंद नमुद आहे. तसेच इतर हक्कात बँक ऑफ महाराष्ट्र व सहकारी सोसायटी यांचे तारणगहाण कर्जाची नोंद आहे. दाव्यातील सर्वच मिळकती वडीलार्जीत नाहीत असे प्रतिवादी नं. १ चे कथन आहे. परंतू, त्यापैकी कोणत्या मिळकती वडीलार्जीत नाहीत याबाबतचा खुलासा प्रतिवादी नं. १ ने म्हणण्यामध्ये केलेला नाही. प्रतिवादी नं. १ च्या २ बहिणींचा दावा मिळकतींमध्ये हिस्सा असल्याचे प्रतिवादी नं.१ चे कथन आहे. यावरुन दावा मिळकती या वडीलार्जीत मिळकती असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. प्रतिवादी नं. १ च्या २ बहिणींनी प्रतिवादी नं. १ विरुध्द दाखल केलेल्या वाटपाचे दाव्याचा क्रमांक अगर त्याबाबतचा कागदोपत्री पुरावा प्रतिवादी नं. १ यांनी अभिलेखावर सादर केलेला नाही. त्यामुळे त्याबाबतचे म्हणण्यात केलेल्या कथनास पुष्टी मिळत नाही.

८. दावा मिळकतींचे ७/१२ सदरी इतर हक्कात बँक ऑफ महाराष्ट्र व सहकारी सोसायटी यांचे तारणगहाण कर्जाची नोंद असेल तर त्यामुळे प्रतिवादी नं. १ यास दावा मिळकती तबदिल करण्याचा प्रश्न उदभवत नसल्याचे प्रतिवादी नं. १ चे म्हणण्यात तथ्य नाही. कारण सदर मिळकतीवर काढलेले कर्ज किती व त्याची परतफेड झाली आहे अर कसे याबाबतचा पुरावा अभिलेखावर नाही. दावा मिळकती

या वडीलार्जीत असल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न झाल्याने, प्रतिवादी नं. १ यांनी दरम्यानचे काळात दावा मिळकती तबदिल केल्यास वादीचे हक्कास बाधा निर्माण होण्याची शक्तता आहे. त्यामुळे तुर्तातूर्त ताकिद न दिल्यास वादीचे अपरीमीत नुकसान होणार असल्याचे वादीने सिध्द केले आहे. सबब, सोईची बाब देखील वादीचे बाजुने आहे. त्यामुळे वादप्रश्न क्रमांक १ ते ३ यांचा निष्कर्ष होकारार्थी देण्यात येत आहे.

९. वादीने प्रथमदर्शनी केस सिध्द केल्याने तसेच सोईची बाब वादीचे बाजुने असल्याने, तुर्तातूर्त ताकिद न दिल्याचे वादीचे अपरीमीत नुकसान होणार असल्याचे वादीने सिध्द केल्याने, प्रस्तुत अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, वादप्रश्न क्रमांक ४ चे उत्तराकरीता, पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. नि. ५ येथील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी नं. १ यांनी दावा मिळकतींची विक्री अगर तबदिलीचा व्यवहार करु नये अशी तुर्तातूर्त ताकिद दाव्याचे अंतिम निकालापर्यंत देण्यात येत आहे.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

( गि.म.साधले)

दिनांकः १.११.२०१७ दिवाणी न्यायाधीश,(क.स्तर)मेढा.